# 'स्वरचित' - काव्य स्पर्धा

---

- कवितेचे शीर्षक : - स्वरचित
- कवी / कवयित्रीचे नाव :- सौ. सुऋचा संजय नाईक

---

पावसात वर्मभेदी दुःखाश्रु ना दिसावे
उध्वस्थ हया मनाला 'संगीत' रिझवावे

असहय जखमा ज्या अपुलेच करीती घाव
वेदनांचा वाहे उरी रक्ताविनाच स्त्राव
झंकारे तानपु-याच्या मनास शांतवावे
उध्वस्थ हया मनाला 'संगीत' रिझवावे

आगंतुक काही घटना घेती मनाचा ठाव
विखुरल्या मना हया वैफल्य साधी डाव
सुरानी बांसरीच्या हलकेच मुग्ध व्हावे
उध्वस्थ हया मनाला 'संगीत' रिझवावे

आले अनेक गेले घालून घाव वर्मी
संसार नाटकाचे आम्ही हो रंगकर्मी
भुमिकेस नाटकाच्या नांदीने खुलवावे
उध्वस्थ हया मनाला 'संगीत' रिझवावे

आपलेच दात चावी आपलेच ओठ जेव्हां
सांगता न येत कुणा लागती कळा ज्या तेव्हां
ओठांनी शीळ अपुल्या घालून धुंद व्हावे
उध्वस्थ हया मनाला 'संगीत' रिझवावे

जे दुःख एकल्याचे कळले कधी कुणा ना
पुसल्या कुणी तयाच्या सा-या जरी खुणा ना
'संगीत' हेच त्याला देऊन साथ जावे
उध्वस्थ हया मनाला 'संगीत' रिझवावे

Arhat Music Therapy